विभागीय आयुक्त, कोकण विभाग
यांचे कार्यालय, कोकण भवन
नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक
जावक क्रमांक - 2 NOV 2011
शाखा

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी उपायुक्त (रोहयो) यांना "विभागप्रमुख" जाहिर करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्र. रोहयो-२००९/प्र.क्र. १२०/मग्रारो-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २५ ऑक्टोबर, २०११

वाचा:- १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारोहयो-२००६/प्र.क्र. १०४/रोहयो-१०, दि. १९/१०/२००६.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. रोहयो-२००९/प्र.क्र. १२०/मग्रारो-३, दि. ९/३/२०११.
३) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. आकृति-२०११/प्र. क्र. ५/मग्रारो-३, दि. ३१/५/२०११.

**प्रस्तावना :**

राज्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यासाठी विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना "विभागप्रमुख" म्हणून घोषित करण्यात आले होते. परंतु आता शासन निर्णय क्र. आकृति-२०११/प्र.क्र. ५/मग्रारो-३, दि. ३१ मे, २०११ अन्वये पदांचा आकृतिबंध बदलण्यात आला आहे. त्यानुसार उपायुक्त (रोहयो) समकक्ष वेतनश्रेणीचे विशेष कार्य अधिकारी तथा उपविकास आयुक्त (रोहयो) हे पद व्यपगत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे इतर अंशतः संवर्ग बदल करण्यात आल्यामुळे उपायुक्त (रोहयो) यांचेकडे रोहयो विभागाची जबाबदारी सोपविण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यासाठी विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना "विभागप्रमुख" म्हणून घोषित करण्यात आले होते. सदर आदेश या आदेशान्वये अधिक्रमित करण्यात येत असून, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दैनंदिन कामकाजामध्ये सुसूत्रितपणा व सुलभ अंमलबजावणीसाठी उपायुक्त (रोहयो) यांना "विभागप्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. हे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-१०.०८/प्र.क्र. ७०/२००८/विनियम, दि. १५ मे, २००९, भाग पहिला-उपविभाग-एक-अ.क्र. १, नि. क्र. २ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

उपायुक्त (रोहयो) कोकण भवन, नवी मुंबई
2 - NOV 2011

( बा. बा. नारायणकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
ना.त १. प्रधान सचिव, (सामान्य प्रशासन विभाग/ वित्त विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/कृषि विभाग/नियोजन विभाग/पाटबंधारे विभाग/महसूल व वन विभाग, ग्रामविकास विभाग) — माहितीसाठी सादर

ROTA-1 H 22-14 (300-10-2011)

क्रमशः....

E:\EGS-3\200909CR120.lwp

विभागीय आयुक्त कोंकण विभाग